PUNE RESEARCH WORLD ISSN 2455-359X
AN INTERNATIONAL JOURNAL OF INTERDISCIPLINARY STUDIES VOL 7, ISSUE 3

# साहित्य निर्मितीसाठी प्रतिभा प्रेरणा व परिश्रम यांचा अनुबंध

**डॉ. यशोद श्रीमंतराव पाटील**
सहयोगी प्राध्यापक (मराठी विभाग)
विवेकानंद कला, सरदार दलिपसिंग वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
समर्थनगर, (छत्रपती संभाजीनगर) औरंगाबाद
महाराष्ट्र भारत

**साहित्य निर्मिती प्रक्रियेबद्दलचे कुतूहल :**

साहित्याच्या अभ्यासात साहित्य निर्मितीची प्रक्रिया कशी असते, या प्रश्नाला प्राचीन काळापासून आजवर अभ्यासकांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे. सर्वसामान्य वाचकाला या बाबतीत कुतूहल असते काय, या प्रश्नाचे नेमके उत्तर देणे कठीण आहे. वाचकांचा संबंध कलाकृतीशी, तिच्या आस्वादाशी असतो. साहित्यकृती वाचताना किंवा वाचून झाल्यावर ती आवडली किंवा नाही याबद्दल अनुकूल किंवा प्रतिकुल असे; मत वाचकाचे होत असतेच. सर्वसामान्य वाचक यशस्वी कलाकृतीमुळे प्रभावित होतो आणि न आवडलेल्या साहित्य-कृतीबद्दल नाराजी व्यक्त करतो. ज्या साहित्यकृतीने आपणास प्रभाविक केले, आपले मन भारून टाकले ती लेखकाने कशी निर्माण केली असेल ते समजून घेण्याची उत्सुकता त्याच्या मनात निर्माण होते. आपणास जे आवडते पण जे आपण निर्माण  करू शकत नाही ते दुसऱ्याने कोणत्या गुणविशेषांमुळे निर्माण केले असेल, हे ही त्याला समजून घ्यावेसे वाटते. अशा अभ्यासू वाचकाच्या जिज्ञासू व्यक्तीतूनच कलेच्या निर्मिती प्रक्रियेचा शोध सुरू होतो. काही वेळा असेही घडते की,

ज्याने कलाकृती निर्माण केली त्याला स्वत:लाच कादंबरी आपणास कशी सुचली, अमूक एखादे नाटक आपण कसे लिहिले अशा प्रकारची वर्णन पुष्कळदा लेखकाने केलेली दिसतात. कलानिर्मितीच्या क्षणी आपण कोणत्या नेमक्या अवस्थेत होतो, आपली मन:स्थिती काय होती हे काही जणांना तपशीलवार सांगता येते असे दिसते. काहीजणांना निर्मितीच्या त्या क्षणी काहीतरी अपूर्व जाणवलेले असते; पण ते जसेच्या तसे सांगता मात्र येत नाही ! काही लेखक आपण विशिष्ट लेखन कसे केले याबद्दल काहीच सांगू शकत नाहीत, तर काही तसे सांगणे हेतुपुरस्सरच टाळतात. या सर्व कारणामुळे कलानिर्मितीचा व्यापार कसा असतो, कलावंतांच्या ठिकाणी अशी कोणती विशेष गुणवत्ता असते, या गोष्टी काहीशा गूढ बनतात. त्यामुळे या प्रश्नाचे अभ्यासकांना  विशेषच आकर्षण वाटते. कलाकृतीच्या निर्मितीप्रक्रियेच्या उलगडा झाला तर कलाकृतीच्या आस्वादाला ते उपकारक ठरते, अशीही अनेकांची भूमिका असते.

**लेखक अथवा कला प्रकारचे वेगळेपण :**

लेखक आणि वाचक, वक्ता आणि श्रोता, नट आणि प्रेक्षक किंवा एकंदरीने कलावंत आणि रसिक या जोड्यामधील आधीचा घटक संख्येने केव्हाही अत्यल्प असतो. व नंतरचा घटक अमर्याद असतो. रंगरेषांचे ज्ञान बहुतेकांना असले तरी सर्वांना चित्रकार होता येत नाही. अभिनय म्हणजे काय ते कळत असले तरी सर्वांना अभिनेता होता येत नाही. याप्रमाणेच साहित्यकृतीतील गोडी किंवा सौंदर्य कशात आहे हे बहुतेकांना जाणवत असले तरी लेखन मात्र करता येत नाही. साहजिकच ज्यांना हे करता येते त्यांना आपोआप एख महत्त्व प्राप्त होते. जर प्रत्येक माणूस गाऊ शकला असता, चित्र रेखाटू शकला असता किंवा लेखन करू शकला असता तर गायक, चित्रकार, लेखक यांना प्रसिद्धी आणि प्रतिष्ठा मिळण्याचे काहीच कारण उरले नसते. जे

सर्वांनाच साध्य आहे त्याचे कोणास कौतुक वाटणार? तेव्हा कलाकार फारच विरळ असतात. त्यामुळेच ते कुतूहलाचे विषय बनतात. तुम्हाला हे कसे काय सूचले? तुम्हाला हे कसे काय जमते? यांसारखे प्रश्न भाबड्या आस्वादांकडून कलाकारांना नेहमीच विचारले जातात.

**प्रतिभावंतांची प्रशंसा :**

कलाकृती निर्माण करण्याची क्षमता ही अशी दुर्मिळ असल्याने तिचा भरपूर गौरव व्हावा आणि अतिशयोक्तीपूर्ण शब्दात त्या निर्माणक शक्तीबद्दल बोलले जावे हे साहजिकच आहे. आनंदवर्धनाने 'अपारे काव्यांसमोर कवि एख प्रजापति:' असे यामुळेच म्हटले आहे. ''आम्हाला वेगळा गतप्रभ झणी होतील तारांगणे, आम्हाला वगळा विकेल कवडीमोलावरी हे जिणे'' असे (काही जणांना आत्मप्रौढीचे वाटणारे) उद्गार केशवसुतांनी काढले आहेत.

टीकाकारांच्या मते कवी हे स्मृतिकार किंवा भाष्यकार या योग्यतेचे असतात. काहीच्या मते कवी हे त्रिकालदर्शी होत. कवींना दिव्यदृष्टी असते. त्यामुळे त्यांना जीवनाचे रहस्य सहजच उलगडते असे काही जणांना वाटते.

कवींच्या, साहित्यिकांच्या किंवा एकंदरीने कलावंतांच्या गुणवत्तेची प्रशंसा करणारे अनेक उदगार नेहमीच काढले गेले आहेत. अशी प्रशंसा करणाऱ्यांमध्ये जसे काही समीक्षक आघाडीवर आहेत त्याप्रमाणे अनेक कलावंतांनाही आपल्या गुणांची स्वत:च प्रशंसा केली आहे.

**साहित्याची असामान्य प्रतिभाविषयी धारणा व साहित्यकार :**

कलानिर्मिती करणारी ही जी महान शक्ती कलावंतांच्या ठिकाणी असते ती 'प्रतिभा' या नावाने ओळखली जाते. ही कविप्रतिभा अलौकिक असते असे अनेकांनी मानले आहे. कलावंताला ती जन्मत:च प्राप्त झालेली असते. प्रतिभेचे देणगी किंवा वरदान घेऊनच तो या जगात अवतरलेला असतो. लौकिक व्यवहाराच्या दृष्टीने तो इथला असला तरी यक्षकिन्नरांच्याप्रमाणे तो एका वेगळ्याच सृष्टीत वावरत असतो. किंबहुना आपल्या प्रतिभेच्या सामर्थ्यांमुळे तो स्वत:च वेगळी सृष्टी निर्माण करू शकतो. यासारख्या, आदराच्या आणि अभिमानाच्या पोटी निर्माण झालेल्या अनेक अत्यूक्तिपूर्ण शब्दांमध्ये प्रतिभेबद्दल, तिच्या दिव्यत्वाबद्दल आजवर बोलले गेलेले आहे. इतरेजनांपेक्षा कलावंतांच्या ठिकाणी काही वेगळी शक्ती असते यात शंका नाही. अनेकांच्या ठिकाणचे हे कलागुण अगदी बालपणापासूनच दिसून येतात. मूर्ती करता येतात तेव्हा जन्मत:च काही गुणवत्ता घेऊन हे कलाकार आलेले असतात यातही शंका नाही. याच गोष्टीवर भर देऊन काही प्राचीन टीकाकारांनी पूर्वजन्मी केलेल्या बऱ्यावाईट गोष्टीवर साहित्यीकांचे साहित्यगुण अवलंबून असतात असे मानले आहे. पूर्वजन्म किंवा पुनर्जन्म यावर विश्वास असणाऱ्यांना हे मत कदाचित मान्य होईल, पण त्यामुळे कलावतांच्या ठिकाणी असलेल्या निर्माणशक्तीवर पुरेसा प्रकाश पडतो असे मात्र होत नाही.

**प्रतिभेचे अनआकलनीय तत्व व साहित्यकाच्या हातून घडवून येणारी कलाकृती :**

प्रतिभावंतांबद्दल अनेक अतिशोक्तिपूर्ण उद्‌गार कलावंतानीही काढले आहेत, आणि टीकारकांनीही काढले आहेत. त्यामुळे कित्येकदा असा समज झालेला दिसतो की कलावंत हा कोणी असामान्य, अतिमानवी सृष्टीतील प्राणी आहे आणि देवादिकांप्रमाणे

त्याने या पृथ्वीतलावर अवतार घेतला आहे. सर्वसामान्य माणसांपेक्षा काही वेगळेपणा, काही विशेष गुणवत्ता आणि रुढ शब्द वापरायचा तर काही एक अलौकिक शक्ती कलावंतांच्या ठिकाणी आढळते; हे खरे आहे. पण प्रश्न असा आहे की हे असामानत्व अखंड, अप्रतिहत, अशा स्वरूपात आयुष्यभर त्याच्या ठिकाणी असते काय? एक तर असे दिसते की, काही कलावंतांच्या हातून त्यांच्या आयुष्याच्या एखाद्याच टप्प्यात किंवा कालखंडात कलाकृती निर्माण होऊ शकतात. एखाद्या दुसऱ्या कला कृतीला जन्म दिल्यावर त्यांचे कलागुण नाहीसे होतात असे मानायचे की काय? काही वेळा असेही दिसते की सर्व आयुष्यभर ज्यांनी काही कलानिर्मिती केली नाही त्यांच्या हातून आयुष्याच्या शेवटी शेवटी काही निर्मिती होते. तेव्हा त्यांचे कलागुण दीर्घकाळ सुप्तावस्थेत पडूनच होते असे समजायचे की काय? कलावंतांचे लौकिक जीवन अनेकदा अगदी सर्वसामान्य माणसांसारखेच असते, असेही आढळून येते. त्याला चरितार्थासाठी शारीरिक, मानसिक व बौद्धीक कष्ट करावे लागतात. लौकीक जीवनात चारचौघाप्रमाणेच त्याच्या आशाआकांक्षा असतात. हर्ष खेदादी भावना इतरांप्रमाणे त्याच्याही ठिकाणी असतात. त्यालाही परिस्थितीपुढे नमते घ्यावे लागते. कित्येकदा अशा माणसाचे आयुष्य चारचौघाप्रमाणे अगदी सरळमार्गी असते. त्याच्या जीवनात फारसे नाट्यमय प्रसंग नसतात. किंवा अनपेक्षित वादळेही उद्भवत नाहीत. असे अगदी सामान्य आयुष्य जगणारा माणूस अलौकिक गुणवत्तेचा कसा, असा अनेकांना प्रश्न पडतो.

**साहित्यकारात कलानिर्मितीच्या वेळची अलौकिकता :**

या प्रश्नाचे उत्तर शोधणे काही कठीण नाही. कोणत्या परिस्थितीत कुठे जन्मणे, कोणत्या वातावरणात वाढणे, कशाचा संस्कार होणे यांसारख्या बऱ्याच गोष्टी माणसाच्या हाती नसतात. पण प्रतिभावंत चारचौघांसारखेच जिणे एरवी जगत असला

तरीही त्याच्या बाबतीत काही वेगळेपणा असतो. त्यांची सवेदनक्षमता अतिशय तरल, सूक्ष्म व तीव्र असते. त्यांना जे जे पाहिलेले व अनुभवलेले असते त्यांचा त्याच्या मनावर खोलवर ठसा उमटत असतो. जीवनाबद्दलचे कुतहूल, ओढ त्याच्या ठिकाणी फार प्रबळ असते. अनुभवाला आलेल्या प्रत्येक गोष्टीची तो संगती लावण्याचा प्रयत्न करतो. प्रत्यक्ष व परीक्ष अनुभव घेण्याची त्याची क्रिया सतत चालू असते. या सर्वांमधून एक वेगळे कल्पनाविश्व, विचारविश्व व भावविश्व निर्माण करण्याची क्षमता त्याच्या ठिकाणी असते. लौकिकदृष्ट्या तो चार चौघांसारखाचा दिसत असला व वागत असला तरी त्याच्या अंतर्मनाचा गूढ व्यापार चालूच असतो. कलाकृतीच्या रूपाने जेव्हा तो प्रकट होतो तेव्हाच हा कुणी वेगळा आहे, असामान्य आहे याची जाणीव होते. प्रभिवावंतांचा गौरव करतांना तो त्रिकालदर्शी असतो, दृष्टा असतो, यांसारखे उदगार यामुळेच काढले गेले आहे.

**साहित्यकाची विहंगमयदृष्टी :**

प्रतिभावंतांची तुलना कित्येकदा योग्याशी केली जाते. योगी ज्याप्रमाणे ध्यान धारणा इत्यादी मार्गाने समाधी अवस्थेपर्यंत पोहोचतो, अनाहत असा नाद त्याला ऐकू येतो, आणि त्याच्या चित्तवृत्ती परब्रह्मांशी एकरूप होऊन गेल्याचा दिव्य अनुभव त्याला प्राप्त होतो. त्याप्रमाणे कलानिर्मिती ही योगासारखीच एक अवस्था मानली गेली आहे. प्रतिभावंतांच्या ठिकाणी असलेले गुण कल्पनाशक्तीच्या बळावर व तीव्र संवेदनक्षमतेमुळे तो इतरांच्या अनुभवांशी एकरूप होतो. दुसऱ्याचे मानसिक व्यापार त्याच्यापुढे उलगडत जातात. दुसऱ्याच्या अंतरंगात प्रवेश करण्याचे सामर्थ्य त्याला प्राप्त झालेले अ्सते. असा परचित्तप्रवेश करण्याचे सामर्थ्य प्राप्त झाल्याशिवाय कथाप्रधान साहित्यातील व्यक्तीदर्शन कोणालाही घडविता येत नाही. स्वत: तो कलावंत स्वभावाने कसाही असेल.  तो स्वार्थी असेल किंवा उदार असेल, त्याला

परमनप्रवेशाच्या सामर्थ्यांमुळे सर्वच प्रकारच्या स्वभावांच्या व्यक्तींच्या ठिकाणी प्रवेश मिळविता येतो. त्यामुळे त्याच्या हातून नानाप्रकारचे पात्रे, निर्माण झालेली दिसतात. लौकीक सृष्टीत जगू शकणार नाही. पण त्याच्या प्रतिभासामर्थ्यांमुळे भावसृष्टीत ही सगळी पात्रे त्याला निर्माण करता येतात.

**प्रतिभेचे सामर्थ्य हे उत्कृष्ट साहित्यिक अथवा कविचे स्थायी बलस्थान असते :**

साहित्यकाच्या अथवा कविच्या ठिकाणी असलेल्या या असामान्य गुणाला प्रतिमा हा शब्द योजला जातो. या म्हणजे प्रकाश, तेज. प्रति हा शब्द अन्य, स्वतंत्र, दुसरा, समांतर अशा अर्थाने वापरला जातो. आकाशस्थ तेजोगोलाप्रमाणे प्रत्येक कलावंत हा जणू काही एक वेगळा सूर्यच असतो. त्याचे स्वत:चे हक वेगवेगळे अंतरिक्ष असते, विश्व असते ! कर्तुम्, अकर्तुम् व अन्यथा कर्तुम् म्हणजेच करण्याची, न करण्याची किंवा वेगळे काही करण्याची अशी सत्ता तो भोगत असतो. कवी हे शब्दसृष्टीचे ईश्वर अशा प्रकारे कवीचा किंवा प्रतिभावंतांचा गौरव यामुळेच केला जात असतो. पण प्रतिभा या शब्दात दुसरीही एक अर्थच्छटा असणे शक्य आहे. एखाद्या ताऱ्यामुळे जसे ग्रह प्रकाशित होतात, पण सृष्टीमध्ये जे जे अनुभवाला आले, त्याला अनुलक्षून कल्पनासृष्टीची निर्मिती होत असते. केवळ काल्पनिक असे जे म्हटले जाते त्यालाही या ना त्या प्रकारे प्रत्यक्षाचा आधार असतोच. तेव्हा प्रत्यक्ष सृष्टी व कल्पनासृष्टी यांच्यामध्ये बिंब-प्रतिबिंब असाच संबंध असतो. बिंबापेक्षा प्रतिबिंब जास्त मोहक दिसते. बिंब असेल तर ते प्रतिबिंब असू शकते आणि प्रतिबिंबावरून बिंबाची कल्पना येते. तेव्हा प्रतिभा या शब्दामुळे कलावंतांचे वेगळे स्वयंपूर्ण अस्तित्व हेही सुचविले गेले आहे व त्याची प्रत्यक्ष जीवनसापेक्षकता हीही व्यक्त झाली आहे.

**श्रेष्ठ साहित्यासाठी लेखकाकडे प्रतिभा शक्तीचा स्थायी भाव असतो :**

इतर सर्व बाबतीत कलावंत हा सर्वसामान्य माणसाप्रमाणेच असला तरी त्याच्याच ठिकाणी कलागुण का प्रगट होतात याचे तार्किक उत्तर देणे शक्य नाही. जीवशास्त्रज्ञांना किंवा मानसशास्त्रज्ञांना विशिष्ट व्यक्तितच असामान्य बुद्धिमत्ता किंवा गुणवत्ता का आढळते, हे रहस्य अजून उलगडलेले नाही. 'कला निर्माण करणारी शक्ती किंवा प्रतिभा ही दैवी देणगी असते. एखाद्यालाच हे ईश्वरी वरदान प्राप्त झालेले असते. अशासारख्या उत्तरावरच समाधान मानावे लागले. काही प्राचीन साहित्याचार्यांनी पूर्वजन्मीच्या संस्कारांकडे याचे श्रेय दिले आहे. आपल्याकडील संतांनी हे श्रेय गुरूकृपेला किंवा साक्षात विठ्ठलाला दिले आहे. विविध शास्त्रे किंवा विद्या किंवा कारागिरी निर्माण करणे या गोष्टी शिकता येतात, शिकविताही येतात. म्हणजेच त्या कष्टसाध्य किंवा प्रयत्नसाध्य अशा असतात. पण गायकाच्या ठिकाणी सुरांची जाणीव आणि लयींचे ज्ञान या गोष्टी उपजतच असाव्या लागतात. प्रयत्नाने, अभ्यासाने त्यात काही भर घालता येते, जोड देता येते. पण प्रतिमा अलौकिक असते असाच बहुतेकांचा अभिप्राय आहे. नित्यनूतन किंवा अपूर्व असे निर्माण करणारी प्रज्ञा म्हणजे प्रतिभा, प्रतिभेचे हे फार महत्वाचे वैशिष्ट्ये आहे. एखाद्या समीक्षकाला, शास्त्रज्ञाला प्रतिभावंतांकडून निर्माण झालेल्या कृतीमध्ये उणिवा काढता येतील. शास्त्रीयदृष्ट्या काही चुका दाखविता येती, पण असे असूनही प्रतिभेचे बळ असल्याशिवाय तशी कलाकृती निर्माण मात्र करता येत नाही. शेक्सपियरला ग्रीक व लॅटीन भाषांचा गंधही नाही. भौगोलिक माहितीच्या वा अन्य प्रकारच्या अनेक चूका त्याच्या हातून घडलेल्या टीकाकारांनी दाखविल्या आहेत. पण शेक्सपियरच्या तोडीचे नाट्यनिर्मितीचे कौशल्य मात्र अशा टीकाकारांना दाखविता आलेले नाही. अशी ही प्रतिभादैवदत्त किंवा निसर्गदत्त असतेच आणि ती उपजतही असते.

**साहित्य निर्मितीसाठी अनुकूल परिस्थितीची साथ :**

मात्र दैवी प्रतिमा असूनही परिस्थिती अनुकूल नसेल तर त्या कलावंतांच्या निर्मितीवर निश्चितच परिणाम होतो. एखाद्याला गोड गळा लाभलेला आहे पण त्याला योग्य ठिकाणी गाण्याची संधीच प्राप्त झाली नाही, तर त्याचे गाणे त्याच्यापुरतेच उरते. चित्र रेखाटण्याचे उत्तम कसब अंगी असूनही त्यास आवश्यक अंशी वाचनसामग्री मिळाली नाही तर चित्रकाराची प्रतिभा लुप्त झाल्याशिवाय राहणार नाही. साहित्यिकाला अनुकूल परिस्थिती प्राप्त होण्यावरच त्याची प्रतिभा प्रकट होणे न होणे अवलंबून असते. अर्थात प्रयत्नाच्या व इच्छाशक्तीच्या बळावर प्रतिकुल परिस्थितीवरही मात करणारे प्रयत्नवादी कलावंत असतातच. पण प्रयत्न करूनही प्रतिभावंतांना कलानिर्मितीला संधी न मिळण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

**अनुकूल अथवा सुसंगत परिस्थितीत साहित्यिकाच्या साहित्य निर्मितीसाठी पुरक ठरते:**

अर्थात अनुकूल परिस्थिती म्हणजे केवळ साधनांची मुबलकता किंवा आर्थिक शारीरिक इत्यादी बाबतीतील संपन्नता नव्हे. या प्रकारच्या विपन्नतेवर पुष्कळदा मात केली जाते, असे दिसते. जन्मभर दारिद्र्याचे चटके सहन करूनही निष्ठेने लेखनकार्य करीत राहणारे साहित्यिक थोडथोडके नाहीत. सर्वच गायकांना भरपूर बिदागी मिळते आणि भरपूर गृहस्वास्थ लाभते असे नाही. तरी त्यांचे गायन चालूच असते. कलावंतांना आर्थिक स्वास्थ्य लाभले तर निर्वेधपणे ते कला निर्माण करू शकतील हे खरे. पण कित्येकदा आर्थिक स्वास्थ्यामुळे सुखासनीता वाढते; तो कलावंत सुस्तावतो असेही अनुभवास येते. शारीरिक दुर्बलतेवर मात करणारे कलावंतही संख्येने पुष्कळ असतात. अंधत्व, पंगुत्व यासारख्या शारीरिक दुबळेपणावर मात करणारे गायक किंवा

लेखन अनेक आढळतात. काही वेळा तर असेही दिसते की अशा व्यक्तींच्या शारीरिक दुर्बलतेमुळे त्यांच्या सर्व शक्ती कलानिर्मितीमध्ये एकवटलेल्या असतात. कलावंताला शारीरिक स्वास्थ्य व निरामयता प्राप्त असेल तर चांगलेच, पण केवळ ते प्राप्त नसणे म्हणजे काही प्रतिकुल परिस्थिती नव्हे. मग अनुकल परिस्थिती म्हणजे नेमके काय? कलागुण प्रकट करण्याची सतत संधी मिळणे आणि त्या कलागुणांना मन:पूर्वक दाद देणारे चाहते मिळणे ही खरी अनुकूल परिस्थिती होय. गायकाला पुन:पुन्हा जाणकार श्रोतुसमुदायापुढे गाण्याची संधी मिळणे, चित्रकाराला सर्वत्र चित्रे प्रदर्शित करण्याची संधी मिळणे आणि साहित्यिकाचे लेखन वाचकांपुढे येण्यात अडथळा नसणे अशी अनुकूलता असेल तर कलानिर्मितीचा उच्च प्रकारचा आनंद स्वत: तो कलावंत मिळवतोच. पण इतरांनाही त्यात सहभागी करून घेतो. आजच्या बाजारी जगात वेगवेगळ्या प्रकारच्या स्पर्धांमुळे चांगल्या गुणवत्तेची कित्येकदा उपेक्षा होते, पुणे येण्याची संधी मिळथ नाही. उत्तम कलावंताप्रमाणे श्रेष्ठ रसिकही दुर्मिळ असतो. नवनवीन निर्माण करण्याची क्षमता आहे पण जाणकारीने तिचा आस्वाद घेणारा रसिक नाही असे घडले तर त्या कलावंताला नाउमेद व्हावे लागते.

## सुचणे अथवा स्फुरण होणे हे साहित्यनिर्मितीचे लक्षणीय सिद्धांत आहे

दैवी प्रतिमा असली आणि अनुकूल परिस्थितीही असली म्हणजे आपोआप कलानिर्मिती झालीच पाहिजे असेही म्हणता येत नाही. तर अशा कलाकाराला ती कलाकृती 'स्फुरावी' लागते. स्फुरण किंवा स्फूर्ती हा प्रतिभाव्यापारातील अनन्यसाधारण असा विशेष आहे. असे अनेकांनी मानले आहे. Spontaneous Overflow हे शब्द वर्डसंस्थेने यासाठीच योजले आहेत. कळीचे फूल कसे होते हे जसे सांगता येत नाही. तसे प्रतिभेला एकाएकी स्फुरण कसे चढते याचेही नेमके उत्तर देता येत नाही. मुळात प्रतिभा ही दैवी शक्ती, आणि त्यातही स्पधूर्ती ही अत्यंत अनियमित,

स्वच्छंदी व लहरी, यामुळे कलानिर्मितीमध्ये एख गूढतेचे वलय निर्माण होते. क्षणात नाहीसे होणारे दि्वव्य भास' असेच या स्फूर्तीचे वर्णन करता येईल. कलावंतांची निर्मिती क्षमता एरवी सुप्तावस्थेतत असते पण एकाएकी ती जागृत होते व निर्मितीकार्य करू लागते. ही अवस्था म्हणजेच स्फूर्ती होय. गायकला केव्हा गाण्याची लहर येईल, सांगता येत नाही. लेखकालाही केव्हा व कशामुळे लिहावेसे वाटेल तेही सांगता येत नाही. कधी त्याला काही काळापर्यंत सतत लिहावेस वाटेल तर कधी दीर्घकाळापर्यंत त्याला काही लिहिण्याची प्रेरणा होणार नाही. अनेकदा कवितासंग्रह वाचतांना शेवटी नोंदलेल्या तारखा पाहिल्या म्हणजे याची प्रचीती येते. एखाद्या वर्षी त्या कवीच्या हातून मोठ्या प्रमाणात काव्यलेखन झालेले असते. कित्येकदा तर एकाच दिवशी अनेक कविता निर्माण झालेल्या आढळतात. आणि त्याच कवीला दोनचार वर्षात एखादी कविताही सुचली नाही असेही त्याच कवितासंग्रहावरून दिसून येते. तेव्हा स्फूर्ती केव्हा प्रकट होईल व केव्हा अदृश्य होईल याचे नेमके गणित मांडणे कठीण असते.

## स्फूर्तीबद्दल समज-गैरसमज :

अशी स्फूर्ती एकाएकी येण्याबद्दलही काही चमत्कारिक समज दिसून येतात. ज्यामुळे धुंदी येईल अशा काही पदार्थाचे सेवन केले म्हणजे स्फूर्ती येते असाही काही जणांना वाटते. पान, तंबाखू, चहा किंवा धूम्रपान अशा सेवानाशीही कित्येक स्फूर्तीचा संबंध जोडतात. वस्तुत: स्फूर्तीसंबंधीचे हे सर्व कृत्रिम उपायच मानले पाहिजेत. या प्रकारच्या सवयीमुळे काही जणांना कलानिर्मिती करणे शक्य होतही असेल. पण असे उपाय योजले म्हणजे हमखास स्फूर्ती आलीच असे मुळीच म्हणतात येत नाही. अनेक कलावंत पूर्णपणे निर्व्यसनी असतात. त्यांच्या बाबतीत तर असल्या कृत्रिम उपायांना काहीच अर्थ नसतो.

## स्फूर्तीचा क्षण :

प्रतिमा किंवा दैवी शक्ती काही थोड्या विशिष्ट व्यक्तीतच का प्रगट होते याचे जसे नेमके कारण सांगता येत नाही त्याप्रमाणे कोणा प्रतिभावंताला कोणत्या वेळी स्फूर्ती येईल याचेही गणित मांडता येत नाही. कलावंताची चिंतन-मननाची व अनुभव ग्रहणाची प्रक्रिया सतत चालूच असते. अशा मानसिक अवस्थेला कोणथे तरी एखादे बाह्यनिमित्त पुरते व एकाएकी प्रत्यक्ष निर्मितीचे कार्य सुरू होते. हे बाह्य निमित्त काही वेळेला अत्यंत क्षुद्र किंवा उपेक्षणीयाही असू शकते. व्हेलवी या फ्रेंच कवीच्या मते झऱ्यातून पाणी केव्हा व कसे वाहू लागेल व तो केव्हा आटेल हे सांगता येत नाही, तसेच स्फूर्तीचे आहे. एकंदरीने साहित्याच्या नीर्मतीचे कलावंताची प्रतिभा हे प्रधान कारण व त्याचबरोबर स्फूर्तीला महत्त्व असतेच व यातून साहित्यनिर्मिती होते.

## साहित्य निर्मिती आणि परिश्रम :

कलावंतांच्या ठिकाणी प्रतिमा असली व तिला वेळोवेळी स्फुरण चढले तरी तेवढ्याने कलाकृती सिद्ध होऊ शकते काय? या प्रश्नाचा शोध प्राचीन काळापासून साहित्य विमर्शकांनी घेतला आहे. एखाद्याला सुरेल आवाजाची देणगी प्राप्त झाली आहे, लयीचे ज्ञानही त्याला चांगले आहे. तेवढ्या दैवी गुणावर त्याला गायक होता येईल का? काव्यव्याकरणांचा शोध घेऊ लागल्यावर असे दिसून येते की, केवळ प्रतिभेचे अस्तित्व पुरेसे नाही. प्रतिभेला व्यासंगाचे व अभ्यासाचे पाठबळ पाहिजेच. ज्याला एखादी पौराणिक कादंबरी किंवा नाटक लिहावयाचे आहे त्याला केवळ कथावस्तू सुचून भागणार नाही. ज्या काळातील जीवनावर ती कलाकृती आधारलेली आहे तो काळ, त्या काळातील मानवी संस्कृती, त्या काळातील मानवाचे वेगवेगळ्या स्तरावरील जीवन, तत्कालीन भौगोलिक, सामाजिक, धार्मिक इत्यादी परीस्थिती,

तत्कालीन मानवाची श्रध्दास्थाने, त्याचा नीतीविचार, त्याचा जीवनविषयक दृष्टीकोण, त्याची भाषा या सर्व गोष्टींचा परिश्रमपूर्वक अभ्यास लेखकाने केला असला पाहिजे. प्रतिभेवर विसंबून राहून प्रतिभेच्या केवळ स्वैर भराऱ्यांनी भरीव कलाकृती निर्माण करता येणार नाही. असल्या रचनेचा पोकळपणा, दुबळेपणा किंवा ठिसुळपणा ताबडतोब उघडकीस येतो. शुरेल आवाज असलेल्या व लयीत मुरलेल्या गायकाने वर्षानुवर्ष तालीम घेतली, तोच राग किती वेगवेगळ्या प्रकारांनी गायला जाऊ शकतो याचा अभ्यास केला, आपल्या गळ्याला यातील कोणती पद्धती साजेशी आहे याचा शोध घेतला तर आश गायकाचे गाणे भक्कम, चिरेबंद होते असा अनुभव आहे. कला कोणतीही असो, तिच्या बाबतीत सूक्ष्म ज्ञानाला व अविरत परिश्रमाला स्थान असतेच असते ! असे ज्ञान आणि व्यासंग यांनाच 'व्युत्पत्ती' असे संबोधण्यात आले आहे. कोणताही साहित्यकार व्युत्पन्न असलाच पाहिजे. ही व्युत्पन्नता मोठ्या कष्टाने साध्य करता येते. कोणतेही ज्ञान प्राप्त व्हायला किमान बौद्धिक पात्रता असावी लागते, हे खरे असले तरी अशी पात्रता असणाऱ्या कोणासही ज्ञान संपादन करता येते, वाढविताही येते म्हणजेच ते प्रयत्नसाध्य असते व साहित्यनिर्मिती लेखकाला प्रतिभा स्फूर्ती अनुकूल परिस्थिती याबरोबरच प्रचंड परिश्रमाची गरज असते.

**संदर्भ :**


१) वाङमयीन संज्ञा संकल्पना कोश : संपा. प्रभा गणोरकर, वसंत आबाजी डहाके व इतर

२) साहित्य समीक्षा स्वरूप आणि विकास : प्रा. ना. वा. गोडबोले व डॉ. गं. ना. जोगळेकर

३) समीक्षेतील नव्या संकल्पना : संपा. डॉ. मनोहर जाधव

४) पाश्चात्य साहित्यविचार : प्रा. ब. लु. शोनार

५) साहित्यशास्त्र : स्वरुप आणि समस्या : वसंत पाटणकर, साहित्यशास्त्र आणि कला : प्रा. पंडित टापरे व प्रा. शिवाजी चव्हाण.